प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना
मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्र. एमडीएफ- ०६१५ / प्र.क्र.३४/उद्योग-९**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०१ सप्टेंबर, २०१६

वाचा: केंद्रीय खनिकर्म मंत्रालय यांचे आदेश क्र. १६.०७.२०१५/ एन,VI (पार्ट) दि.१६.०९.२०१५

**प्रस्तावना**

खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम १९५७ च्या कलम ९ (ब) उपकलम १ च्या तरतूदीनुसार राज्य शासनाद्वारे प्रत्येक जिल्हयाकरिता खनिज बाधीत क्षेत्राचा विकास करण्याकरिता खनिज विकास प्रतिष्ठान स्थापन करण्याचे अधिसूचित करेल अशी तरतूद आहे.

केंद्र शासनाने प्रस्तुत विषयी जाणिवपूर्वक निर्णय घेऊन देशातील सर्व राज्यामधील खनिज विकास प्रतिष्ठानमार्फत खनिज बाधीत क्षेत्राचा विकास करणे साठी एकवाक्यता रहावी व अशा कार्यक्रमामध्ये सामाजिक विकास व मूलभूत गरजा तथील लोकसंख्या व बाधीत क्षेत्राच्या स्थानिक गरजा लक्षात घेऊन प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमधुन राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन दि.१६.९.२०१५ च्या पत्रान्व्ये सर्व राज्यांना निर्देश दिले आहेत. तसेच प्रस्तुत सूचना खाण व( विकासन व विनियमन) अधिनियम १९५७ च्या कलम २० (अ) च्या तरतूदनुसार राष्ट्रीयहीत लक्षात घेऊन केंद्र शासनाने राज्य शासनास प्रस्तुत प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना राबविणे व त्यानुषंगाने मार्गदर्शक सूचना जिल्हा ,खनिज प्रतिष्ठानच्या नियमावलीमध्ये अंतभूत करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**शासन निर्णय:**

प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना संबंधित जिल्हयाच्या खनिज प्रतिष्ठान निधीमधून राबविण्यात यावी. प्रस्तुत प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनाच सर्वसाधरण उद्दिष्ट खालील प्रमाणे राहिल:-

अ) खनिज बाधित क्षेत्राचा विकास व कल्याण करण्यासाठी विविध प्रकल्प कार्यक्रम राबविणे, व सदर कार्यक्रम/प्रकल्प केंद्र/राज्य शासनाच्या अस्तीवातील चालू कार्यक्रम व योजनांना सहाय्यभूत पूरक रहातील.

ब) खनिज जिल्हयात खनिकर्म करताना व त्यानंतर झालेल्या कृतीमूळे तेथील जनतेवर झालेले पर्यावरण, आरोग्य व सामाजिक व आर्थिक परिस्थितीवरील आघात/ परिणाम कमी करणे व त्यावर उपाययोजना करणे.

क) खाण बाधित क्षेत्रातील व्यक्तींना दिर्घ मूदतीचे शाश्वत उपजिविकेचे साधण उपलब्ध करुन देणे.

२. **प्रस्तुत प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना चे मार्गदर्शक तत्वे खालील प्रमाणे राहतील:-**

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना करीता बाधित क्षेत्र व व्यक्तीची निवड

**१) बाधित क्षेत्र:-**

अ) प्रत्यक्ष बाधीत क्षेत्र - ज्या ठिकाणी खनिकर्म निगडीत पूढील कृती केल्या जातात जसे , उत्खणन , खनिकर्म , सुरुंग विस्फोट , व कचरा विसर्जन (डम्प्स्, तळे, वाहतूक तळे, इत्यादी.)

I) खाण चालू असलेल्या क्षेत्रातील गावे व ग्रामपंचायती . सदर खाण क्षेत्र लगतचे गांव, तालुका, जिल्हा व राज्य च्या हद्दीपर्यंत राहू शकेल.

II) एखादया खाण व खाण समुहाच्या परिसरातील राज्य शासनाने निश्चित केलेले क्षेत्र, असे क्षेत्र ( या प्रयोजनासाठी खाण अथवा डम्प पासून २० कि.मी. त्रीज्येचे क्षेत्र) त्याच जिल्हयात असेल अथवा लगतच्या जिल्हयातील असेल हे गौण राहील.

III) प्रकल्प प्राधिका-यांनी खाणीमूळे विस्तापीत झालेल्या व पूर्नवसीत झालेल्या कुटुंबांची गावे .

IV) खनिकर्म क्षेत्रामधून आपले आर्थिक गरजा भागविण्यासाठी परंपरागत हक्क जसे चराई, गौण वन उत्पादनांचे संकलन इत्यादी, कामे ज्या गांवामधून केले जातात अशी गावे प्रत्यक्ष बाधीत क्षेत्र म्हणून गणण्यात येतील.

**ब) अप्रत्यक्ष बाधीत क्षेत्र-**

खनिकर्म संबंधित कृती मूळे स्थानिक जनतेवर आर्थिक, सामाजिक व पर्यावरण विषयक परिणाम होतात असे क्षेत्र खनिकर्म कामकाजांमूळे होणारे विपरित परिणाम प्रामुख्याने पाणी, जमीन व हवेचे प्रदूषण, पाण्याचा प्रसा कमी होणे, भूजलाची पातळी खालावणे, खनिकर्म व खनिजाच्या वाहतूकीमुळेतसेच मुलभूत सोईसुविधांवर नैसर्गिक साधनसंपत्तीवर पडणारा ताण व त्यामुळे पाण्याची अडवणूक व प्रदूषण होय.

क) जिल्हा खनिज प्रतिष्ठाण अशा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधीत क्षेत्राची यादी तयार करेल व ती वेळोवेळी अद्ययावत करेल.

२) **बाधीत व्यक्ती:-**

अ) प्रत्यक्ष बाधीत व्यक्ती मध्ये खालील समावेश असेल.

I) **बाधीत कुटुंब**:-भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३, च्या कलम ३ (क) अन्वये व्याख्या केलेले कुटुंब.

II) **विस्थापित कुटुंब**:- भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३, च्या कलम ३ (क) अन्वये च्या कलम ३ (१२) अन्वये व्याख्या केलेले कुटुंब.

III) **ग्रामसभेने योग्य निवड केलेल्या अन्य व्यक्ती**.

ब) खाण काम परिसरात ज्या जमिनीवर संबंधित व्यक्तींचा कायदेशिर व व्यावसायिक हक्क असेल आणि परंपरागत हक्क असतील अशा व्यक्तीचा खाण बाधीत व्यक्तींमध्ये समावेश असेल.

क) बाधीत कुटुंबाची निवड शक्यतोवर ग्रामसभेतील स्थानिक/निवडून आलेल्या प्रतिनिधींमार्फत करण्यात यावी.
ड) जिल्हा खनिज प्रतिष्ठाण बाधीत कुटुंबांची यादी वेळोवेळी तयार करेल व ती अद्ययावत करेल.

**२. निधीचा विनियोग:-**

**१) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र योजनेची व्याप्ती:-**

प्रस्तूत प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना मधील खालील घटकांचा समावेश असेल.

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना मधील प्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्रामध्ये एकूण निधीच्या किमान २/३ निधी खर्च करण्यात यावा व उर्वरित कमाल १/३ निधी अप्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्रात खर्च करण्यात यावा. प्रस्तुत योजनेत खाण बाधित क्षेत्राचा विकास करताना हाती घ्यावयाच्या बाबी पुढीलप्रमाणे राहतील -

अ) **उच्च प्राथम्य बाबी** - ज्या ठिकाणी योजनेतील किमान ६०% निधी खालील बाबींवर खर्च करण्यात येईल.

**१. पिण्याचे पाणी पुरवठा**-केंद्रीभूत जलशुध्दीकरण यंत्रणा, जलप्रक्रिया केंद्र, तात्पुरती/शाश्वत जल वितरण सुविधा ज्यामध्ये एकल पाणी पुरवठा योजनेचा समावेश असेल, जल वितरण पाईपलाईन टाकणे.

**२. पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रण उपाययोजना**:- सांडपाणी प्रक्रिया केंद्र तलाव भूजल नाले व अन्य जल स्त्रोतांचा प्रदूषण नियंत्रण खाणकाम व डम्प्स् च्या कृतीमुळे त्या क्षेत्रात होणाऱ्या वायू व जल प्रदूषण कमी करणे. खाण सांडपाणी व्यवस्था,पर्यावरण सुलभ व शाश्वत खाण विकासाकरिता चालु व बंद खाणीतील जल, वायू व जमीन प्रदूषण नियंत्रण उपाययोजना व खाण प्रदूषण प्रतिबंधक तंत्रज्ञान, आणि उपाययोजना.

**३. आरोग्य:**- खाण बाधीत क्षेत्रामध्ये प्राथमिक/माध्यमिक आरोग्य सुविधा पुरविणे हे उद्दिष्ट असावे. यामध्ये केवळ आरोग्य पायाभूत सुविधा निर्मितीवर भर नसावा पण त्यासोबत आवश्यक मनुष्यबळ साधन साहित्य देखील पुरविण्यात याव्यात जेणेकरून परिणामकारकरित्या उपयोगात येतील. याव्दारे निर्माण करण्यात येणाऱ्या सुविधा स्थानिक प्रशासन, राज्य व केंद्र शासन यांच्याव्दारे निर्माण केलेल्या अस्तीत्वातील आरोग्य सुविधाला सहाय्यभूत असतील. खाणीशी निगडीत आजार व रोगांवर उपाययोजना करण्याकरिता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मायनर्स हेल्थ (National Institute of Miner॰s Health) यांच्याकडील तांत्रिक सहाय्य घेवून विशेष सुविधा निर्माण करता येतील. खाण बाधीत व्यक्तींच्या गट आरोग्य विमा योजनेची अंमलबजावणी करता येईल.

**४. शिक्षण:-** शाळेची इमारत बांधकाम, अतिरिक्त वर्गखोल्यांचे बांधकाम, प्रयोगशाळा, वाचनालय, कलावर्ग, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी सुविधा, शिक्षक व विद्यार्थ्यांकरिता निवासी होस्टेल, क्रिडा सुविधा, शिक्षक व अन्य सहाय्यभूत कर्मचारी यांच्या सेवा, ई-शिक्षण सुविधा, अन्य परिवहन सुविधा जसे बस/सायकल/रिक्षा/इत्यादि. पोषणआहार निगडीत कार्यक्रम

**५. महिला व बालकल्याण:-** प्रस्तूत योजनेअंतर्गत माता व बाल आरोग्य कुपोषण, संसर्गजन्य आजार यांच्याशी निगडीत समस्यांवर उपाययोजना घेता येतील.

**६. वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तीचे कल्याण:-**प्रस्तूत योजने अंतर्गत वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तीचे कल्याण योजना हाती घेता येतील.

**७. कौशल्य विकास:-** स्थानिक पात्र व्यक्तींच्या आर्थिक प्रगती व उत्पन्न् वाढीसाठी व उदरनिर्वाहासाठी कौशल्य विकास, प्रकल्प्/योजनांमध्ये प्रशिक्षण, कौशल्य् विकास केंद्र, स्वयंरोजगार योजना व स्वयंसहाय्यता गटांना सहाय्य्.

**८. स्वच्छता:-** कचऱ्याचे संकलन, वाहतूक व विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता, मल निस्सारण प्रक्रिया केंद्र, सार्वजनिक स्वच्छतागृहे व इतर अनुषंगिक सुविधा

**ब) अन्य प्राथम्य बाबी:-** ज्या ठिकाणी प्रस्तूत योजनेतील कमाल ४०% निधी खर्च करता येईल

१) भौतिक पायाभूत सुविधा- रस्ते, पुल,रेल्वे व जल वाहतूक प्रकल्प.
२) जलसंपदा:-जलसिंचनाचे पर्यायी स्त्रोतांचा विकास करणे, आधुनिक व स्थानिक पर्यावरणाशी सुलभ जलसिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.
३) ऊर्जा व पाणलोट क्षेत्र विकास:- पावसाच्या पाण्याचे साठवणूक करणे व पर्यायी ऊर्जा स्त्रोताचा विकास करणे, फळबाग, अत्याधुनिक एकात्मिक शेती, आर्थिक वनीकरण व पाणलोट क्षेत्राचे पुनर्भरण.
४) खनिकर्म जिल्ह्यातील पर्यावरण दर्जा वाढ करण्याकरिता अन्य उपाययोजना.

**२) सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना:-**

अ) प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेत हाती घ्यावयाचे उपक्रम शक्यतोवर जेथे शक्य असेल तेथे राज्य / केंद्र शासनाच्या अर्थसहायेत चालू असलेल्या योजना / प्रकल्पांना सहाय्यभूत व परस्पर पुरक राहतील. प्रदुषण कर्ताने खर्च करावयाचे तत्वावर आधारित उपक्रम सदर योजनेत हाती घेण्यात येऊ नयेत. तथापि, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या अधिकारास बाधा न आणता राज्यस्तरिय योजना व जिल्हा स्तरिय योजनांमध्ये एकवाक्यता व एकसुत्रता आणली जाईल असे उपक्रम हाती घेतले जातील जेणे करून विकास व कल्याण उपक्रमाव्दारे राज्यस्तरिय अर्थसंकल्पीय संसाधनाला अतिरिक्त हातभार लागेल.

ब) राज्य शासन विहीत करेल अशा कमाल मर्यादेच्या अधिन राहून जिल्हा खनिज प्रतिष्ठाणच्या एकूण वार्षिक जमा रकमेच्या जास्तीत जास्त ५ टक्के रकम प्रशासकीय खर्चाकरिता उपयोगात आणता येईल (किमान रु.२५ लक्ष ते कमाल रु.२ कोटी एवढया मर्यादेत ) शक्यतोवर प्रस्तुत योजनेत कोणत्याही तात्पुरत्या स्थानापन्न पदे निर्माण करण्यात येऊ नयेत. प्रतिष्ठाकरिता कोणत्याही तात्पुरते / स्थानापन्न पद निर्मिती आणि वाहन खरेदी करिता राज्य शासनाची पुर्व परवानगी आवश्यक राहील. तथापि, किमान आवश्यक पदे कंत्राटी तत्वावर भरता येऊ शकतील.

क) जर एखादी जिल्ह्यातील खाणीचे क्षेत्र अन्य जिल्ह्यात देखील येत असल्यास अन्य जिल्ह्यात असलेल्या क्षेत्राच्या टक्केवारीच्या सम प्रमाणात खाण मालकाकडून प्राप्त होणारे अंशदान संबंधीत जिल्हा खनिज प्रतिष्ठाणला बाधित क्षेत्राच्या विकास कामांसाठी हस्तांतरित करण्यात येईल. एखाद्या प्रकरणात बाधीत क्षेत्राच्या / व्यक्तिच्या विकासा संबंधीत जिल्ह्याच्या हद्दी बाहेर देखील हाती घ्यावयाचा झाल्यास राज्य शासनाच्या परवानगी नंतर हाती घेता येईल. रस्ते, पुल बांधणी इत्यादी सारखे सर्वसाधारण पायाभूत सुविधा प्रकल्प निधी विनियोगाच्या प्राथम्य क्रमानुसार विहित आर्थिक मर्यादेच्या पलिकडे खर्च करावयाचे झाल्यास प्रकरण परत्वे संबंधित जिल्ह्याचे विशेष महत्व लक्षात घेऊन राज्य शासनाच्या मान्यतेने हाती घेता येईल. क्रमानुसार प्राथम्य क्रमाच्या विहित आर्थिक मर्यादेच्या पलिकडे खर्च करावयाचे प्रस्तावांची माहिती केंद्र शासनाला देणे व राज्य शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

ड) शाश्वत रोजगार निर्मितीसाठी प्रतिष्ठाणच्या वार्षिक जमा रकमेपैकी पर्याप्त रकम या प्रयोजनासाठी राखीव निधी म्हणून ठेवण्यात येईल.

३. **अनुसुचित क्षेत्राकरिता विशेष तरतूद**-

प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या अनुसुचित क्षेत्रात अवलंबविण्याची कार्यपध्दती भारतीय संविधानचे कलम २४४ व त्यासह परिशिष्ठ V व VI मधील अनुसूचित जाती आणि आदिवासी क्षेत्र आणि पंचायत ( अनुसूचित क्षेत्राचा विस्तार ) अधिनियम १९९६ PESA आणि अनुसुचित जमाती आणि अन्य पारंपारिक वन निवासी ( वन हक्कांची मान्यता ) अधिनियम २००६ च्या तरतूदी प्रमाणे राहील.

I) **खाण बाधित गावे अनुसुचित क्षेत्रात असल्यास-**

ग्राम सभेची मान्यता खालील बाबींसाठी आवश्यक राहील.

**अ)** प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेतील सर्व आराखडे , कार्यक्रम व प्रकल्पांना.

**आ)** राज्य शासनाच्या प्रचलित मार्गदर्शक तत्वाप्रमाणे लाभार्थीची निवड करणे.

II) प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेत हाती घेतलेल्या कामांचा अहवाल प्रत्येक आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर ग्रामसभेत सादर करण्यात येईल.

(ग्राम सभा म्हणजे पंचायत (अनुसुचित क्षेत्राचा विस्तार) अधिनियम १९९६ (४० / १९९६) च्या तरतूदींच्या अंमलबजावणीच्या उद्देषाने अभिप्रेत असलेला अर्थ)

४. **करार / कामांची अंमलबजावणी -**

१) राज्य शासन विहीत करेल त्या पध्दतीने जिल्हा खनिज प्रतिष्ठाण वस्तु / कामांचे संपादणूक (Procurement) करेल.

२) लाभार्थी व सर्व यंत्रणांना निधीचे वाटप त्यांच्या बॅकेच्या खात्यात करण्यात येईल.

**५. पारदर्शकतेची पुर्तता -**

१) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठाण संगणक संकेतस्थळाची (Web site) निर्मिती व व्यवस्थापन करेल व त्यावर खालील माहीती ठेवेल व वेळोवेळी अद्यावत करेल.

i) जिल्हा खनिज प्रतिष्ठाणचे संगठण व त्या अंतर्गत विविध शाखा असल्यास.

ii) खाण बाधित क्षेत्र व व्यक्तिंचा तपशिल व यादी.

iii) खाणपट्टाधारक व अन्य यांच्या कडून प्राप्त होणारे एकूण अंशदानाचे तिमाही विवरणपत्र

iv) जिल्हा खनिज प्रतिष्ठाणच्या सर्व बैठक सूची, कार्यवृत्त / इतिवृत्त आणि कार्य पुर्तता अहवाल.

v) वार्षिक अराखडा आणि अर्थसंकल्प कार्यआदेश व वार्षिक अहवाल.

vi) **चालु कामांची आनलाईन स्थिती** - प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेतील सर्व प्रकल्प / कार्यक्रमाचे अंमलबजावणीची सध्यस्थिती / प्रगतीचा तपशिल संकेतस्थळावर देण्यात येईल. ज्यामध्ये कामाचे स्वरूप व विवरण , लाभार्थीची यादी , प्रस्तावित किंमत , अंमलबजावणी यंत्रना काम चालु व समाप्तीचा अपेक्षित कालावधी / दिनांक , गत तिमाहीचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल.

vii) विविध कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थीची यादी

viii) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत स्वेछेने प्रसारित करावयाचा तपशिल.

**६. लेखा प्ररिक्षण -**

जिल्हा खनिज प्रतिष्ठाणचे लेखे प्रति वर्ष प्रतिष्ठाण तर्फे नियुक्त सनदी लेखापालाकडून अथवा राज्य शासन विहीत करेल अशा पध्दतीने लेखापरिक्षण करेल व त्याचा अहवाल तसेच वार्षिक अहवाल जनतेने माहितीस्तव उपलब्ध करण्यात येईल.

**७. वार्षिक अहवाल-**

**अ)** प्रति वर्ष जिल्हा खनिज प्रतिष्ठाण आर्थिक वर्ष समाप्तीच्या तीन महीन्याच्या आत वर्ष भरतील उपक्रमाचा वार्षिक अहवाल तयार करणे व प्रतिष्ठाणच्या समोर ठेवेल.

**आ)** प्रतिष्ठाणच्या मान्यतेनंतर एक महिन्यात वार्षिक अहवाल राज्य शासनास सादर करण्यात येईल तसेच संबंधित प्रतिष्ठाणच्या संगणक संकेत स्थळावर देखील उपलब्ध करून देण्यात येईल.

**इ)** प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठाणचा वार्षिक अहवाल राज्य विधी मंडळास सादर करण्यात येईल.

उपरोक्त मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सर्व जिल्हा खनिज प्रतिष्ठाण यांनी प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी करावी व विवक्षीत मुद्यांबाबत स्पष्टीकरण हवे असल्यास राज्य शासनास संदर्भ करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९०११३०२०२३११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Shankarrao Ingle

Digitally signed by Sanjay Shankarrao Ingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, serialNumber=d337930b14433dc62c0154af2bbc60bb5a6edcaa66b7f34596c50a27eb0f6333, cn=Sanjay Shankarrao Ingle
Date: 2016.09.03 15:21:16 +05'30'

**( संजय इंगळे )**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती)
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा.मंत्री ( उद्योग व खनिकर्म ) महाराष्ट्र राज्य
८. मा. राज्यमंत्री ( खनिकर्म ) महाराष्ट्र राज्य
९. मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,
१०. मा.सर्व पालकमंत्री, संबंधित जिल्हा
११. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्य,
१२. मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
१३. अमुस ( वित्त ) वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई-३२
१४. अमुस नियोजन विभाग , मंत्रालय, मुंबई-३२
१५. प्रधान सचिव ( व्यय ) वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई-३२
१६. प्रधान सचिव ( कौशल्य विकास विभाग ) , मंत्रालय, मुंबई-३२
१७. प्रधान सचिव ( वने ) महसूल व वन विभाग , मंत्रालय, मुंबई-३२
१८. प्रधान सचिव पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१९. सचिव विधी व न्याय विभाग , मंत्रालय, मुंबई-३२
२०. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र खनिकर्म महामंडळ, नागपूर
२२. सर्व जिल्हाधिकारी, संबंधित जिल्हा
२३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,
२४. सर्व जिल्हा खनिकर्म अधिकारी,
२५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनाय, मुंबई.
२६. महालेखापाल (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२७. महालेखापाल (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, संबंधित जिल्हा
२९. सर्व कार्यासने, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.